**साखर आयुक्तालय , महाराष्ट्र शासन**

**महाराष्ट्र राज्य ऊस उत्पादक शेतकरी ऊस नोंदणी**

# महा-ऊस नोंदणी

साखर आयुक्त कार्यालयामार्फत महाराष्ट्र राज्यातील ऊस उत्पादक शेतकरी यांच्यासाठी ऊस पिक नोंदणीसाठी "**महा-ऊस नोंदणी**" हे मोबाईल ॲप तयार करण्यात आले आहेत.

यामार्फत ज्या शेतकऱ्याना साखर कारखान्यात जाऊन ऊस नोंद करणे शक्य नाही. असे शेतकरी या मोबाईल ॲप मार्फत स्वतःच्या ऊस क्षेत्राची नोंद करू शकतात. तसेच ज्या शेतकऱ्यांनी साखर कारखान्यात ऊस क्षेत्र नोंद केली आहे, त्यांच्या नोंदणीची माहिती या ॲप मध्ये दिसून येईल.

# मोबाईल ॲप वापरण्याबाबत सूचना




- सर्व प्रथम गूगल प्ले स्टोअर मधून “**महा-ऊस नोंदणी (Maha-US Nondani)**” हे ॲप डाउनलोड करून घ्यावे. खालील QR Code आपल्या मोबाईल मध्ये स्कॅन करून आपण Google Play Store वरती जाऊ शकता.

- ॲप डाउनलोड केल्यानंतर महाराष्ट्र राज्यातील ऊस उत्पादक शेतकरी आपल्याकडील चालू हंगामातील ऊस क्षेत्राची माहिती नोंदविण्यासाठी येथे Click करा. “**ऊस क्षेत्राची माहिती भरा**” असे दिसून येईल. त्या ठिकाणी आपण बटन दाबावे.

# मोबाईल ॲप वापरण्याबाबत सूचना




- त्यानंतर "ऊस क्षेत्र नोंद करावयाच्या शेतकऱ्याची माहिती" हे पेज दिसून येईल. त्यामध्ये क्रमाने माहिती भरावी मोबाईल नंबर, आधार नंबर, पहिले नाव, मधले नाव, आडनाव भरावे.त्यांनतर **"पुढे"** हे बटन दाबावे.
- यानंतर " ऊस क्षेत्र असलेल्या ठिकाणाची माहिती" हे पेज दिसून येईल. या ठिकाणी आपण प्रथम जिल्हा निवडावा, नंतर तालुका निवडावा,यानंतर गाव निवडावे. शेवटी गट नंबर / सर्वे नंबर टाकावा. यानंतर **"पुढे"** हे बटन दाबावे.



# मोबाईल ॲप वापरण्याबाबत सूचना




- यानंतर "ऊस लागवडीची माहिती" हे पेज दिसून येईल यामध्ये आपण लागवड प्रकार आपण निवडावा, ऊसाची जात निवडावी, लागवड दिनांक भरावा. नंतर ऊस क्षेत्र गुंठ्या मध्ये भरावे. यानंतर **"पुढे"** हे बटन दाबावे.

- नंतर "ऊस पिक उपलब्द माहिती कोणत्या कारखान्यास कळवू इच्छिता" हे पेज दिसून येईल, यामध्ये आपण ज्या कारखान्यामध्ये ऊस नोंद करावयाची आहे असे तीन कारखाने निवडावे. (कमीत कमी एक कारखाना निवडावा). यानंतर **"पुढे"** हे बटन दाबावे.



# मोबाईल ॲप वापरण्याबाबत सूचना




- यानंतर आपणास धन्यवाद ..! असा मेसेज दिसून येईल व आपण निवडलेले संबंधित साखर कारखाने आपणास संपर्क साधतील.
- यानंतर आपणास साखर कारखान्यातील आपली ऊस नोंद पाहण्यासाठी" असे दिसून येईल या ठिकाणी आपण साखर कारखान्यात नोंदविलेला मोबाईल नंबर भरावा नंतर **"पुढे"** या बटनावर क्लिक करावे.



# मोबाईल ॲप वापरण्याबाबत सूचना




- यानंतर या ठिकाणी आपणास
  - आपण ॲपमध्ये प्रविष्ट केलेली ऊस नोंद
  - साखर कारखान्याने स्वीकारलेली ऊस नोंद
  - साखर कारखान्याने  नाकारलेली ऊस नोंद दिसून येईल.

**धन्यवाद ...!**